सकाळ

# माजगावकर यांच्या 'गंमत-जंमत गेम्स' पुस्तकाचे प्रकाशन



पुणे : 'पार्टीकरिता गंमत-जंमत गेम्स' या पुस्तकाचे प्रकाशन राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विभावरी देशपांडे.

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ६ : ''जीवनातील अनमोल क्षणांच्या स्मृतीच जीवनातील रंग वाढवत असतात. प्रत्येकाने हे क्षण टिपले पाहिजेत,'' असे मत अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी व्यक्त केले.

चैत्राली माजगावकर-भंडारी यांनी लिहिलेल्या व 'इंद्रायणी साहित्य' तर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'पार्टीकरिता गंमत-जंमत गेम्स' या पुस्तकाचे प्रकाशन व संकेतस्थळाचेही उद्‍घाटन सोलापूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी अभिनेत्री विभावरी देशपांडे, 'कलारंग'चे अध्यक्ष अमित गोरखे उपस्थित होते.

ते म्हणाले, ''प्रत्येक व्यक्तीचे रोजचे आयुष्य धावपळीचे झाले आहे. त्यामध्ये चांगले क्षण वेचण्याची आणि ते स्मृतीत साठविण्याची गरज असते.''

सण समारंभ महत्त्वाचे असले तरी त्यामध्ये तोचतोपणा असतो. अशा वेळी या पुस्तकाची नक्कीच मदत होते, असे देशपांडे यांनी सांगितले. लेखिका माजगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुरेंद्र माजगावकर यांनी सूत्रसंचालन केले. श्याम कोपर्डेकर यांनी आभार मानले.

TODAY
३
सकाळ : पुणे
बुधवार, ७।४।२०१०

प्रभात

# 'गंमत-जंमत गेम्स'चे प्रकाशन



चैताली माजगावकर-भंडारी लिखित 'पार्टीकरिता गंमत-जंमत गेम्स' पुस्तकाचे प्रकाशन राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते झाले. समवेत अभिनेत्री विभावरी देशपांडे.

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी)- जीवनातील अनमोल क्षणांच्या स्मृतीच जीवनाची रंगत वाढवत असतात. असे क्षण प्रत्येकाने सजग राहून टिपायला हवे, असे अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी येथे सांगितले.

'इंद्रायणी साहित्य'च्या वतीने चैताली माजगावकर-भंडारी यांनी लिहिलेल्या 'पार्टीकरिता गंमत-जंमत गेम्स' या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूरकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अभिनेत्री विभावरी देशपांडे, 'कलारंग'चे अध्यक्ष अमित गोरखे आदी उपस्थित होते. हे पुस्तक अतिशय वाचनीय असून नात्यांतील रंगत वाढविण्यास त्याची मदत होईल, असे देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र माजगावकर यांनी केले; तर शाम कोपर्डेकर यांनी आभार मानले.